वाचा :- 1. शासन परिपत्रक क्रमांक रॉकेल/1399/345/प्रक्र-13/नापु-27 दिनांक 23/9/1999
2. शासन पुरक पत्र क्रमांक रॉकेल / 1399/ 345/प्रक्र-13 नापु-27 दिनांक 13/10/1999,
3. शासन परिपत्रक क्रमांक रॉकेल 1399/345/प्रक्र /13/नापु-27 दिनांक 30 एप्रिल 2001
4. शासन परिपत्रक क्रमांक रॉकेल 1903/प्रक्र02914/नापु-27 दिनांक 3 एप्रिल 2003
5. शासन पत्र क्रमांक रॉकेल /1608/ प्रक्र /873/ नापु-27 दिनांक 03 जुन 2008
6. शासन पत्र क्रमांक रॉकेल /1011/ /सीआर-354/सीएस -27 दिनांक 02/11/2011

क्र. 2011/ पुरवठा/केईआर/सीआर/192
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
दिनांक : 03/12/2011

# आ दे श

**विषय :- माहे डिसेबर 2011 या महिन्याचे 100 टक्के केरोसिन नियतन वाटप आदेश**

1.महाराष्ट्र शासनाचे संदर्भीय पत्रकान्वये हिंगोली जिल्हयाचा माहे डिसेबर 2011 या महिन्या करीता 100 टक्के केरोसिन कोटा **1248 के.एल.** केरोसिनचे नियतन आदेश एंजट तालुका निहाय व घाऊक / अर्धघाऊक परवानाधारक निहाय केरोसिन नियतनाचे आदेश सोबतच्या विवरण पत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे देण्यात येत आहे.

2.शासनाच्या दिनांक 12/1/2001 चे सुचने नुसार कंपनी एंजट यांनी देखील खालील दर्शविलेल्या तारखांना कंपनी कडुन केरोसिन उचल केली पाहीजे.

**अ.नियतनाच्या केरोसिन 60 टक्के दिनांक 10 तारखे पर्यत उचल करावी.**
**ब. नियतनाच्या केरोसिन 85 टक्के दिनांक 15 तारखे पर्यत उचल करावी.**
**क. नियतनाच्या केरोसिन 100 टक्के दिनांक 25 तारखे पर्यत उचल करावी.**

3.अर्ध घाऊक परवाना धारकांनी सध्या वरील तारखे पर्यत एंजट कडुन दिलेली उचल करुन तहसीलदार यांनी ठरवून दिल्यानुसार किरकोळ , हॉकर्स, स्वस्त धान्य दुकानदार यांना केरोसिनचे वाटप करावे.

4.केरोसिन एंजट घाऊक / अर्ध घाऊक परवाना धरकांनी वर नमुद केल्या प्रमाणे मुदतीत केरोसिनचे उचल करुन त्या बाबतचा अहवाल 26 तारखेस या कार्यालयास तसेच वाटप केल्या बाबतचा अहवाल तहसीलदार यांचे प्रमाणपत्रासहीत सादर करावे.

5.विवरण पत्रा मध्ये देण्यात आलेल्या जे केरोसिन एंजट / अर्ध घाऊक परवानाधारक आहेत, त्यांना किरकोळ परवानाधारकाच्या व्यवसायाच्या ठिकाणा पर्यत करावे.

6.जिल्हयात केरोसिन द्वार वितरण योजना सुरु असुन सर्व एंजट /घाऊक / अर्ध घाऊक परवाना धारकांना त्यांना देण्यात येणारा कोटा 50 टक्के गांवाना किरकोळ परवाना धारकांच्या द्वारा पर्यत नजीकच्या गावा पर्यत पोहचता करावा व ज्या रुट वरती आपले टॅकर जाणार आहे त्या रुट वरती सर्व परवानाधारक व दुकानदार यांना प्रथम सुचना देण्यात याव्यात. आपणास देण्यात येणा-या व जोडण्यात आलेल्या गावांना वाटप करते वेळी तहसीलदार यांनी नेमलेल्या प्रतिनिधी समोर वाटप करावे , न केल्यास त्याची जबाबदारी घाऊक / अर्ध घाऊक विक्रेत्यावर निश्तिच करुन त्यांच्या विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल. द्वार वितरण योजनेत वाटप करावा त्यांच्या कोठयाचा प्रति आराखडा संबंधित तहसिलदार यांच्याकडुन हस्तगत करुन त्याप्रमाणे महिन्यातुन दोन वेळेस वाटप करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

अर्ध घाऊक विक्रेत्याच्या ठिकाणा पर्यत केरोसिन पोहचविण्याची जबाबदारी एंजन्टची राहील ज्या डेपोचा केरोसिन कोठा आपणास मंजुर केला आहे. त्या डेपोच्या दरा प्रमाणे एंजट / घाऊक / अर्ध घाऊक परवानाधारक यांनी विक्री करावी हे बंधनकारक आहे.. ठरवून दिलेल्या दरापेक्षा जादा दराने विक्री केल्याचे निदर्शणास आल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

7.एंजट तसेच घाऊक / अर्ध घाऊक विक्रेत्यांनी टॅकर प्राप्त झाल्यानंतर तो सिलबंद टॅकर प्रथम तहसीलदार कार्यालयात घेवून जाऊन निरिक्षण अधिकारी / तहसीलदार याचेकडुन पाहणी होऊन त्यांची नोंद तहसील रजिस्टर मध्ये नोंद झाल्यावर प्रमाणपत्र घेऊन या कार्यालयास दाखल करावे.

8. शासन निर्णय दिनांक 25 सप्टेबर 2001 अन्वये काही गावातील किरकोळ विक्रेत्यांना थेट घाऊक केरोसीन परवानाधारक यांचे मार्फत केरोसीनचा पुरवठा होत असला तरी हा पुरवठा अर्ध धाऊक वितरकामार्फत झाल्याचे गृहीत धरुन अर्ध धाऊक दर निश्चित करण्यात यावेत व या निश्चित केलेल्या दरा नुसार किरकोळ विक्रेत्यांना केरोसीन कोटा उपलब्ध करुन द्यावा.तथापी, अशा तालुक्यात अशी दर निश्चिती करतांना ज्या काही किरकोळ विक्रेत्यांना प्रत्यक्षात अर्ध धाऊक वितरकांमार्फत केरोसीनचा पुरवठा होत नसला तरी केरोसीनचा पुरवठा अर्ध घाऊक वितरकामार्फत झाल्याचे गृहित धरुन दर निश्चिती करण्यात आली असल्याने व किरकोळ विक्रेत्याने घाऊक वितरकाकडे केरोसीनची रक्कम जमा करताना अर्ध धाऊक वितरकाच्या कमिशनपोटी रक्कम जमा केलेली असल्याने घाऊक वितरकाने ही रक्कम शासन जमा करावी.

9.वेळोवेळी शासनाने व या कार्यालयाने दिलेल्या आदेशा नुसार केरोसिन उचल वाटप करुन त्याचा अहवाल महिन्याच्या 5 तारखे पर्यत सादर करावा. अहवाल वेळेवर सादर न केल्यास सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.

10.तहसीलदार व पुरवठा निरिक्षण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी तालुक्यातील नेमून दिलेल्या नियतनाची विहित तारखांना एंजट व घाऊक / अर्ध घाऊक धारक यांनी उचल करुन स्वस्त धान्य दुकानदार ,किरकोळ, हॉकर्स मार्फत कार्ड धारकांना वाटप करतात किंवा नाही त्या बाबत वेळोवेळी अचानक तपासणी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत:- विवरण पत्र

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

स्वाक्षरित

जिल्हाधिकारी हिंगोली
करीता

प्रतिलिपी,माहितीस्तव सविनय सादर,

1. मा.उपसचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई 32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. उप आयुक्त पुरवठा विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद
3.मा. खासदार श्री. सुभाष वगानखेडे,हिंगोली लोकसभा मतदार संघ हिंगोली
4.मा. आमदार श्री. जयप्रकाशजी दांडेगांवकर, विधानसभा सदस्य वसमत जिल्हा हिंगोली
5.मा. आमदार श्री. भाऊराव पाटील गोरेगांवकर , विधानसभा सदस्य हिंगोली
6.मा. आमदार श्री. राजीव सातव , विधानसभा मतदार सदस्य,कळमनुरी
7.मा. अध्यक्ष जिल्हा परिषद हिंगोली
8.उपविभागीय अधिकारी हिंगोली/वसमत यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
9.तहसीलदार ------------------------ जिल्हा हिंगोली यांना देवून कळविण्यात येते की, किरकोळ केरोसिन परवानाधारकाच्या आदेशाच्या प्रती प्रसिध्द करण्यात याव्यात व तसा अहवाल या कार्यालयास उलट टपाली सादर करावा.
10.जिल्हा माहिती अधिकारी,हिंगोली यांना प्रसिध्दीस्तव देण्यात येते.
11.जिल्हा सुचना विज्ञान केंद्र हिंगोली यांना माहितीस्तव.
12.सर्व श्री. ---------------------------------------- संबंधित एंजट / घाऊक /अर्ध घाऊक परवानाधारक जिल्हा हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव ( मार्फत तहसीलदार -----------)
व आवश्यक त्या कार्यवाहिस्तव.

जिल्हाधिकारी, हिंगोली
करीता

### वितवरण पत्र

### कंपनी निहाय घाऊक / अर्ध घाऊक निहाय व तालुका निहाय 100 % केरोसिन नियतन माहे डिसेंबर 2011

आकडे के.एल. मध्ये

| अ.क्र. | अर्ध घाऊक परवानाधारकाचे नांव | एंजट / घाऊक परवानाधारकाचे नांव | | | | | | एकुण नियतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बी.पी.सी. 384 के.एल. | | एच.पी.सी.708 के.एल. | | | आय.ओ.सी. 156 के.एल. | 1248 के.एल. |
| | | एम.बी. राठोर हिंगोली 228 के.एल. | वसमत ऑईल एंजन्सी वसंमत 156 के.एल. | बी.टी. खुराणा हिंगोली 288 के.एल. | ए.पी. पटेल हिंगोली 192 के.एल. | उमेदमल मिकुलाल वसमत 228 के.एल. | सुभाष चौधरी ॲन्ड कंपनी 156 के.एल. | |
| | **तालुका हिंगोली** | | | | | | | |
| 1 | मे. राजस्थान ट्रेडींग कंपनी हिंगोली | 24 | 12 | 18 | 24 | 0 | 12 | 90 |
| 2 | रमेशचंद्र मोहनलाल शर्मा कन्हेरगांव | 24 | 24 | 18 | 12 | 0 | 12 | 90 |
| 3 | कचरुलाल रामप्रसाद लाहोटी भागीदार ललीतराज ब्रिजलाल खुराणा हिंगोली | 0 | 0 | 72 | 12 | 0 | 0 | 84 |
| | **एकुण** | **48** | **36** | **108** | **48** | **0** | **24** | **264** |
| | **तालुका औंढा** | | | | | | | |
| 4 | लक्ष्मण बालाजी डफडे भागीदार बालाजी रामचंद्र रुद्रवार जवळा बाजार | 24 | 0 | 12 | 12 | 12 | 0 | 60 |
| 5 | प्रभाकर तुळशिराम विभुते जवळा बाजार | 12 | 0 | 12 | 12 | 12 | 12 | 60 |
| 6 | साईबाबा ट्रेडिंग कंपनी शिरडशहापुर | 12 | 0 | 12 | 12 | 12 | 12 | 60 |
| 7 | जमशेदखॉं हसनखॉं पठाणं शिरड शहापुर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 12 | 12 |
| | **एकुण** | **48** | **0** | **36** | **36** | **36** | **36** | **192** |
| | **ता सेनगांव** | | | | | | | |
| 8 | मे.साईबाबा ट्रेडींग कंपनी भानखेडा | 60 | 0 | 36 | 48 | 48 | 24 | 216 |
| | **एकुण** | **60** | **0** | **36** | **48** | **48** | **24** | **216** |
| | **तालुका कळमनुरी** | | | | | | | |
| 9 | नंदकिशोर बन्सीलाल शर्मा कळमनुरी | 12 | 12 | 0 | 12 | 0 | 0 | 36 |
| 10 | मदनलाल शंकरलाल शर्मा वारंगा फाटा | 12 | 0 | 0 | 12 | 12 | 0 | 36 |
| 11 | मे.विजयकुमार संजयकुमार अग्रवाल वारंगाफाटा | 12 | 0 | 12 | 0 | 0 | 12 | 36 |
| 12 | मे.अग्रवाल ट्रेडिंग कंपनी आखाडा बाळापुर | 12 | 0 | 12 | 0 | 0 | 12 | 36 |
| 13 | म.झिया म.उस्मान कुरेशी आखाडा बाळापुर | 0 | 12 | 12 | 0 | 12 | 0 | 36 |
| 14 | मे.विजयकुमार संजयकुमार अग्रवाल आ.बाळापुर | 12 | 0 | 12 | 0 | 12 | 0 | 36 |
| 15 | अशोक रामराव पतंगे आखाडा बाळापुर | 0 | 0 | 12 | 0 | 12 | 6 | 30 |
| 16 | नितिन मंगेश अडकिणे डोगरकडा | 0 | 12 | 12 | 0 | 0 | 6 | 30 |
| | **एकुण** | **60** | **36** | **72** | **24** | **48** | **36** | **276** |
| | **वसमत** | | | | | | | |
| 17 | उमेदमल भिकुलाल वसमत | 0 | 0 | 0 | 0 | 60 | 0 | 60 |
| 18 | वसमत ऑईल एजन्सी वसमत | 0 | 60 | 0 | 0 | 0 | 0 | 60 |
| 19 | नारायण मुकिंदा डफडे भागीदार मनिष तोष्णीवाल वसमत | 12 | 24 | 36 | 36 | 36 | 36 | 180 |
| | एकुण | 12 | 84 | 36 | 36 | 96 | 36 | 300 |
| | एकुण हिंगोली जिल्हा | 228 | 156 | 288 | 192 | 228 | 156 | 1248 |

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

3.12.11

जिल्हाधिकारी हिंगोली
करीता